# जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड


| | |
|---|---|
| वेब साईट - www.nanded.gov.in | इ-मेल nandedrdc@gmail.com |
| दुरध्वनी - ०२४६२ - २३५०७७ | फॅक्स - ०२४६२-२३८५०० |


जा.क्र.२०२०/मशाका-१/आस्था २/सीआर-३० दि ०४ /१२/२०२०

प्रति,

उपविभागीय अधिकारी,

नांदेड/देगलूर/भोकर/बिलोली/

धर्माबाद/कंधार/हदगाव.

**विषय** - तलाठी पदभरती २०१९ .

**संदर्भ** - सहसचिव महसुल व वनविभाग यांचे पत्र क्र. पभमा- २०२०/प्र.क्र.११९ /ई-१० दि.०२/१२/२०२०

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रान्वये महापरीक्षा पोर्टल मार्फत नांदेड जिल्ह्यातील तलाठी पदभरती २०१९ करीता महापरीक्षा पोर्टलवर अर्ज केलेल्या उमेदवारांची परीक्षा दि.०२.०७.२०१९ ते दि.२६.०७.२०१९ या कालावधीत घेण्यात आलेली आहे. महापरीक्षा पोर्टल मार्फत उपलब्ध डाटावरुन नांदेड जिल्ह्यातील तलाठी पदभरती २०१९ अंतर्गत मुळ कागदपत्र तपासणीअंती, जिल्हा निवड समितीची बैठक घेवुन शासन निर्णय क्रमांक: प्रानिमं-१२१६/(प्र.क्र. ६५/१६)/१३-अ दि १३ जुन, २०१८ व शासन निर्णय क्र.बीसीसी -२०१८/प्र.क्र.५८१ ए/१६-ब दि.०४ जुलै २०१९ मधील तरतुदीनुसार तलाठी पदाची अंतिम निवड यादी व प्रतिक्षा यादी अंतिम करुन प्रसिध्द करण्यात आली.

आपल्याकडे वर्ग करण्यात येत असलेल्या उमेदवारांची सज्जानिहाय नियुक्ती करताना संबंधितांकडुन लेखी पसंतीक्रम घेवून, गुणानुक्रमे नियुक्तीची कार्यवाही करावी व त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

तसेच तलाठी पदासाठी अंतिम निवड यादीतील उमेदवार आपणाकडे वर्ग करण्यात येत आहेत. अंतिम निवड यादीनूसार निवड केलेल्या उमेदवारांना खालील अटीस तसेच तलाठी भरती नियमावलीतील तरतुदी, जात प्रमाणपत्र आणि उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र याबाबतचे नियम विचारात घेवुन नियुक्ती देण्याची कार्यवाही करावी. उपविभाग निहाय वर्ग केलेल्या उमेदवारांचा तपशिल यासोबतचा आदेशामध्ये देण्यात आला आहे.

१) निवड केलेल्या उमेदवारांना मुळ कागदपत्रे व अर्हता तपासणीच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती आदेश निर्गमीत करुन रुजू करुन घेण्याची कार्यवाही करावी.

२) नॉन क्रीमीलेअरची वैधता दिनांक तपासून घ्यावी.

३) माजी सैनिक घटकातील उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यापूर्वी त्यांनी माजी सैनिक या घटकाचा लाभ घेतलेला नाही याची खात्री जिल्हा सैनिक बोर्डाकडून करुन घ्यावी. तदनंतरच नियुक्ती आदेश निर्गमित करावेत.

४) अंशकालीन घटकातील उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यापुर्वी त्यांनी अंशकालीन या घटकाचा लाभ घेतलेला नाही, याची खात्री प्रमाणपत्र निर्गमीत करणा-या कार्यालयाकडुन करुन घ्यावी. तदनंतरच नियुक्ती आदेश निर्गमीत करावेत.

५) शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र बीसीसी-२०११-प्रक्र-१०६४-२०११-१६-ब दि.१२.१२.२०११ नूसार सरळसेवा भरतीमध्ये ज्या उमेदवाराची निवड विशिष्ट मागास प्रवर्गासाठी आरक्षीत असलेल्या जागेवर झाली आहे अशा उमेदवारास, त्याच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पूरती नियुक्तीचे आदेश निर्गमित करावेत अशा सूचना आहेत. तसेच नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून एक महिण्याच्या आत जात प्रमाणपत्राची वैधता संबंधीचा प्रस्ताव सर्व संबंधीत जात पडताळणी समितीकडे सादर करने आवश्यक आहे. सदर पावती प्राप्त झाल्यानंतर त्याचा पाठपूरावा कार्यालयाच्या स्तरावरुन करणे आवश्यक आहे. तसेच या निर्णयातील इतर बाबीचीही पूर्तता करावी.

६) तलाठी पदासाठी वर्ग करण्यात आलेले, अंशकालीन उमेदवाराचे अंशकालीन असल्याबाबतचे प्रमाणपत्र, प्रकल्पग्रस्त उमेदवारांचे प्रकल्पग्रस्त असल्याबाबतचे प्रमाणपत्र, खेळाडु उमेदवारावांचे खेळाडु असल्याबाबतचे प्रमाणपत्र व उन्नत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र आणि अपंग (अल्पदृष्टी व अस्थिव्यंग) उमेदवारांचे अपंग असल्याबाबतचे प्रमाणपत्र, व माजी सैनिक उमेदवारांचे माजी सैनिक असल्याबाबतचे प्रमाणपत्र.त्या त्या घटकनिहाय लाभ घेतलेल्या कार्यालयाकडुन शासकीय नियमानुसार तपासणी केल्यानंतर संबंधितांस नियुक्तीचे आदेश निर्गमीत करावे.

७) निवड केलेल्या उमेदवारांना शासन सेवेतील वरील अटीशिवाय सरळसेवा भरती नियमावलीनुसार सर्व अटी व शर्तीची पूर्तता करून उमेदवारांना नियुक्तीचे आदेश तातडीने निर्गमित करुन डाक नोंदीने पाठवावेत. जर डाक नोंदीचा गोषवारा वेळीच प्राप्त न झाल्यास महाराष्ट्र महसूल संहिता १९६६ मधील तरतुदीनुसार आदेश तामीलीस्तव सर्व संबंधीत तहसिलदारांना पाठवावा आदेश तामील होणे अत्यंत महत्वाचे आहे. कारण नियुक्ती आदेश दिलेले उमेदवार नियुक्ती आदेश तामील होवूनही रुजू झाले नाही, तर विहीत केलेला कालावधी संपल्यानंतर प्रतिक्षा यादीतील उमेदवारास नियुक्ती देण्यासाठी प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर करावा.

पदस्थापनेचे आदेश तामिल होवुनही अनुपालन अहवाल न पाठविल्यास त्यास आपणास जबाबदार धरण्यात येईल. कारण सदर निवड यादी एक वर्षासाठी किंवा निवडसुची तयार करताना ज्या दिनांकापर्यतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यंत या पैकी जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यत विधीग्राह्य राहील त्यानंतर हि निवडसुची व्यपगत होईल.

वरील कार्यवाही करून अनूपालन अहवाल आठ दिवसाचे आत सादर करावा.

(सोबत - संबंधीताचे अर्ज, तपासणी सुची, अंतिम निवड यादी
व वर्ग करण्याबाबतचा आदेश)

जिल्हाधिकारी नांदेड

१. याची एक प्रत श्री ............................................ रा.................................
यांना देवून कळविण्यात येते की, त्यांना................................ उपविभागीय कार्यालयात नियुक्तीसाठी वर्ग केले आहे. त्यांनी उपविभागीय अधिकारी................... यांचेशी संपर्क साधावा.

निवासी उपजिल्हाधिकारी नांदेड

# जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड


| वेब साईट - www.nanded.gov.in | इ-मेल nandedrdc@gmail.com |
|---|---|
| दुरध्वनी - ०२४६२ - २३५०७७ | फॅक्स § ०२४६२-२३८५०० |


जा.क्र.२०२०/मशाका-१/आस्था २/ सीआर-३० दि. ०८ /१२/२०२०

**आदेश**

महापरीक्षा पोर्टल मार्फत नांदेड जिल्ह्यातील तलाठी पदभरती २०१९ करीता महापरीक्षा पोर्टलवर अर्ज केलेल्या उमेदवारांची परीक्षा दि.०२.०७.२०१९ ते दि.२६.०७.२०१९ या कालावधीत घेण्यात आलेली आहे. परीक्षेअंती निवड करण्यात आलेल्या पात्र उमेदवारांची मुळ कागदपत्र तपासणीअंती अंतिम निवड यादी तयार करुन खालीलप्रमाणे उपविभागीय कार्यालयात वर्ग करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अंतिम यादीत निवड झालेल्या उमेदवाराचे नाव | प्राप्त गुण | निवडीचा प्रवर्ग (समांतर आरक्षणासह) | वर्ग करावयाचे उपविभागीय कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | Balaji Gopalrao Patil | १७८ | खुला (सर्वसाधारण) | धर्माबाद |
| २ | Netaji Purushottam Rayaji | १७६ | खुला (सर्वसाधारण) | कंधार |
| ३ | PRANITA MADHUKAR KALE | १७४ | खुला (सर्वसाधारण) | बिलोली |
| ४ | KUSHAVARTA BALIRAM SHINDE | १६८ | खुला (महिला) | कंधार |
| ५ | ASHWANTA SHIVAJI KASPATE | १६६ | खुला (महिला) | कंधार |
| ६ | SARIKA AVINASH KHANDAGALE | १६४ | खुला (महिला) | कंधार |
| ७ | RUPALI SURYABHAN HAMBARDE | १६४ | खुला (महिला) | हदगाव |
| ८ | Kiran Manikrao Naikwade | १६४ | खुला (महिला) | देगलुर |
| ९ | Shamal Subhashrao Bhavsar | १६४ | खुला (महिला) | बिलोली |
| १० | Anjali Nemaji Vaidya | १६२ | खुला (महिला) | धर्माबाद |
| ११ | SUKHDEO RADHAKISAN AUTI | १४२ | खुला (मा.सै.) | कंधार |
| १२ | RAJIV GHANSHYAM SANAP | १४२ | खुला (मा.सै.) | देगलुर |
| १३ | DATTA ASHOK CHEKE | १३८ | खुला (मा.सै.) | भोकर |
| १४ | RAJU BABAN MEHETRE | १३६ | खुला (मा.सै.) | बिलोली |
| १५ | VIKAS TANAJI WAGHAMARE | १४४ | खुला (अपंग) | कंधार |
| १६ | MANOJ JAYRAM WAGHMARE | १६२ | अनु.जाती (सर्वसाधारण) | भोकर |
| १७ | MADHURI NIVRUTI BHOSALE | १५४ | अनु. जाती (महिला) | धर्माबाद |
| १८ | GANGADHAR SADHU MORE | ११८ | अनु. जाती (मा.सैनिक) | भोकर |
| १९ | AMIT ROHIDAS GAIKWAD | १४० | अनु.जाती (प्रकल्पग्रस्त) | बिलोली |
| २० | TATERAO DHONDIBA KAMBLE | ११० | अनु. जाती (अंशकालीन) | बिलोली |
| २१ | SUSHILA SHIVAJI THAKARE | १५० | अनु.जमाती (महिला) | नांदेड |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २२ | PALLAVI PUNDLIK PREMULWAD | १४६ | अनु.जमाती (महिला) | कंधार |
| २३ | DIPALI GANPATI JAMADAR | १४६ | अनु.जमाती (महिला) | देगलूर |
| २४ | NANDESHWAR ASHOK TATIKONDALWAR | १६४ | विमाप्र (सर्वसाधारण) | देगलुर |
| २५ | POOJA GANGADHAR GADHE | १५२ | इ.मा.व. (महिला) | कंधार |
| २६ | PRIYA VITTHALRAO BHALERAO | १५० | इ.मा.व. (महिला) | देगलुर |
| २७ | BALAJI BALIRAM EKADE | १३४ | इ.मा.व. (मा.सै.) | कंधार |
| २८ | PRAKASH UTTAMRAO HASNABADE | १२६ | इ.मा.व. (मा.सै.) | देगलुर |
| २९ | PRAFUL BHASHKARRAO THAKARE | १५८ | इ.मा.व. (प्रकल्पग्रस्त) | हदगाव |
| ३० | VILAS LIMBAJI MAHAJAN | ९४ | इ.मा.व. (अंशकालीन) | हदगाव |
| ३१ | SHANKAR GANGADHARRAO PATIL | १७२ | आ.दु.घ. (सर्वसाधारण) | बिलोली |
| ३२ | AMAJAT JABBARKHAN PATHAN | १६२ | आ.दु.घ. (सर्वसाधारण) | हदगाव |
| ३३ | SHRIDEVI VAIJINATH USTURGE | १५४ | आ.दु.घ.(महिला) | कंधार |

जिल्हाधिकारी नांदेड

१. याची एक प्रत श्री ................................................ रा.................................
यांना देवून कळविण्यात येते की, त्यांना.................................... उपविभागीय कार्यालयात नियुक्तीसाठी वर्ग केले आहे. त्यांनी उपविभागीय अधिकारी.................... यांचेशी संपर्क साधावा.

-स्वा-

निवासी उपजिल्हाधिकारी नांदेड